


## तेरचे वस्तू संग्रहालय

तेर येथे कै. रामलिंगअप्पा लामतुरे वस्तू संग्रहालय आहे. उस्मानाबाद पासून २२ कि.मी. अंतरावर हे गाव आहे. कै. रामलिंगअप्पा लामतुरे यांनी चौकस बुद्धीने व ऐतिहासिक वस्तू जमवण्याचा छंद या जोरावर वस्तू जमावल्या व हा लाखो रुपयांचा संग्रह त्यांनी २२ जानेवारी १९७१ रोजी शासनाकडे सुपूर्द केला. शासनाने तेथे भव्य वास्तू उभी केली असून अभ्यासक व पर्यटकांना हि वास्तू उपयुक्त ठरली आहे.

## माणकेश्वर हेमांडपंथी देवालय

परंडा तालुक्यातील माणकेश्वर हेमाडपंथी देवालय प्रसिद्ध आहे. सर्वात जुने व सर्वात सुंदर देवालय आहे. प्रत्येक छोटया-मोठ्या दगडावर अप्रतिम शिल्प कोरलेले आहे. गाभाऱ्यात महादेवाची प्रचंड मोठी पिंड आहे.





## कल्याण स्वामी मठ

महापुरुषांच्या वास्तव्याचे एक ठिकाण परंडा तालुक्यात डोमगाव येथे आहे. एका आड वाटेला, सोनारी जवळ असलेल्या या गावात समर्थ रामदासांचे पट्टशिष्य पूज्य कल्याणस्वामींचा यांचा मठ आहे. या कल्याणस्वामीच्या हस्ताक्षरातील दासबोधाची सुरेख अक्षरातील प्रत व खुद्द रामदासांनी त्यात केलेल्या दुरुस्त्या या स्थानाला आगळे महत्व आहे.

## सिद्धेश्वर वडगाव

प्राचीन शिवमंदिर, श्रावण सोमवरी व महाशिवरात्रीच्या दिवशी भाविक दर्शनास येतात. हे ठिकाण उस्मानाबाद पासून ८ कि.मी. अंतरावर आहे.





## रामलिंग मंदिर

रामलिंग हे सोलापूर-बीड मार्गावरील येडशी जवळ आहे. यासंबंधी असे सांगितले जाते कि, या प्रवाह संगमात स्नान करून प्रभू श्रीरामांनी शिवलिंगाची पूजा केली, म्हणून भगवान शंकर यांचे रामलिंग या नावाने प्रसिद्ध झाले. सीताहरणाच्या वेळी या दंडकरण्यातून राम लक्ष्मणाच संचार झाला. त्यांचे हे स्थान आहे. श्रावण महिना व दर सोमवारी भक्तगण मोठ्या प्रमाणात येथे येतात.

---

१७ वे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे

अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन

२१,२२ व २३ एप्रिल २०१७, उस्मानाबाद

अभिमान संस्कृतीचा

**||माझं गाव, माझं संमेलन||**

# उस्मानाबाद

# —पर्यटन—





## श्री तुळजाभवानी मंदिर

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेचे तुळजापूर येथे वास्तव्य आहे. तुळजापूर हे गाव सोलापूर औरंगाबाद रस्त्यावर सोलापूरहून ४२ कि.मी.तर उस्मानाबादहून २२ कि.मी. अंतरावर आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांना भवानी तलवार देउन हिंदवी स्वराज्य स्थापनेचा आशीर्वाद देणारी तुळजापूरची ही देवी भवानी माता महिषासुर मर्दिनी, तुकाई, रामवरदायिनी, जगदंबा आदी नावानी ओळखली जाते. जगदंबा मातेची मूर्ती गंडकी शिळेची असून ती अष्टभुजा आहे. आश्विन व चैत्र पौणिमेला येथे मोठी यात्रा भरते.

## श्री संत गोरोबाकाका

उस्मानाबाद पासून २२ कि.मी. अंतरावर असलेल्या तेर या गावी प्राचीन संस्कृतीच्या पाउलखुणा आजही स्पष्ट जाणवतात. प्राचीन काळात प्रदेशासी व्यापार संबंध असलेले तेर हे गाव प्रख्यात राष्ट्रीय संत गोरोबाकाका कुंभार यांच्यामुळे महाराष्ट्राला ज्ञात आहे. या गावात जुने राहते घर असून तेरणा नदीच्या काठावर त्यांची समाधी असलेले मंदिर आहे. येथील कांही मंदिरे स्थापत्य शास्त्राच्या बांधकामामुळे प्रसिद्ध आहेत. गावाच्या आग्रेय दिशेला श्री नृसिंहाचे एक जुने मंदिर आहे. तर गावच्या मध्यभागी त्रिविक्रमाच्या भव्य अशा मूर्ती समोर विष्णूची मूर्ती आहे.






## ऐतिहासिक परंडा किल्ला

कल्याणीच्या चालुक्याच्या काळात परिमडा (परंडा) हा एक महत्वाचा परगणा होता. तेथील किल्ला हा ३५ मिटर लांब तेवढाच रुंद आहे. बहामनी राजवटीत मुहमदशहा बहामनीचा पंतप्रधान महमूद गवान याने तो बांधला इ.स.१६०० च्या सुमारास हा किल्ला मोगलांच्या ताब्यात गेला. त्यानंतर १६२८ साली शहाजी राजांनी तो ताब्यात घेतला व दोन वर्षे तो त्यांच्या ताब्यात होता. इ.स. १६३० मध्ये तो विजापूरच्या आदिलशाकडे गेला. त्यांच्याच मुरार नावाच्या सेनापतीने या किल्ल्यातील प्रसिद्ध मुलुखमैदान तोफ १६३२ साली विजापूर येथे नेली.

## ऐतिहासिक नळदुर्ग किल्ला

उस्मानाबाद पासून ४६ कि.मी. अंतरावर असलेले नळदुर्ग किल्ल्यातील पाणी महाल प्रेक्षणीय व प्रसिद्ध आहे. हा प्रचंड किल्ला अडीच कि.मी.घेराचा असून अजूनही सुस्थितीत आहे. या किल्ल्याजवळून वाहणा-या बोरी नदीचे पाणी अडवून त्याचा उपयोग दुर्ग राक्षणासाठी केलेला फक्त येथेच आढळतो. तीन चारशे वर्षापूर्वी देखील लष्करी शास्त्र किती पुढारलेले होते. याचा हा सबळ पुरावाच आहे. पावसाळ्यात या पाणी महालावरून पडणा-या पाहण्याचे विहंगम दृश्य पाहण्यासाठी दरवर्षी पर्यटक येतात.





## धाराशिव लेणी

उस्मानाबाद शहरापासून अवघ्या आठ कि.मी. अंतरावर एक प्राचीन लेणी आहे. उपलब्ध कागदपत्रावरून हि लेणी ७ व्या शतकातील असावी. हि गुहा नील व महानील नावाच्या दिद्याधारांनी निर्माण केली होती. पहिली लेणी पश्चिमेला लहान व अपूर्ण अवस्थेत आहे. त्यांच्या बाजूला दुसरी लेणी आहे. त्यात सुमारे ८ ते १० व्हरांडा असून त्याचे छत ३२ खांबानी पेलून धरले आहे. आतील बाजूस पार्श्वनाथाची भव्य मूर्ती आहे. प्रवेशद्वाराजवळ पाण्याचे कुंड असून त्यात बारमाही स्वच्छ व गार पाणी असते.

## जैन धर्मीयांचे तीर्थक्षेत्र – कुंथलगिरी

भारतात जैन धर्मीयांची अनेक तीर्थक्षेत्र (धार्मिकस्थाने) आहेत. या तीर्थक्षेत्राचे सिद्धक्षेत्र,(निर्माणभूमी) कल्याणक्षेत्र व अतिशय क्षेत्र असे तीन प्रकार समजतात. ज्या तीर्थक्षेत्रावर चोवीस तीर्थकर किंवा मुनी यापैकी कानोनितरी मोक्षाला गेलेले असतात.त्याला सिद्धक्षेत्र म्हणतात. दक्षिण भारतातील एकमेव दिगंबर जैन सिद्धक्षेत्र म्हणजे कुंथलगिरी उस्मानाबाद-औरंगाबाद रस्त्यावर ६० कि.मी. व सरमकुंडी फाट्यापासून डावीकडे २ कि.मी. अंतरावर पहाडावर हे तीर्थक्षेत्र आहे.





## अणदूरचा खंडोबा

सोलापूर-हैद्राबाद राष्ट्रीय मार्गावर अणदूर हे गाव आहे. त्या काळात त्याचे आनंदवूर हे नाव होते. मनिमल्ल दैत्याचा संहार करण्यासाठी शंकराने मल्हारी मार्तंड भैरवनाचा अवतार धारण केला. त्यानंतर भक्त व मुनीच्या प्रर्थनेनुसार भैरवरुपी शंकर अरीमैलार येथे स्वयंभू लीन्गुपणे प्रगट झाले. हे मंदिर हेमाडपंथी असून आवारात अनेक दीपमाळा आहेत. अणदुरला मार्गशीष ६ ला इ मैलापुरला पौष शुद्ध १५ ला यात्रा भरते. इथे प्राण्यांचा नाही तर पुरणाचा नैवेद्य दिला जातो.

## येरमाळयाची येडाई

येरमाळा हे गाव उस्मानाबाद पासून ५० कि. मी. अंतरावर आहे. प्रभुरामचंद्राना वनवासाला जाताना प्रलोभन दाखवण्यासाठी देवी पार्वतीने सतीचे रुप घेउन भुलवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा रामाने पार्वतीला येडी आहेस. असे म्हटले. तेव्हापासून हि देवी इथे राहिली व तिचे नाव येडाई उर्फ येडेश्वरी झाले. या आख्यायिकेचा उल्लेख रेणुका स्त्रोत्रात असल्याचे पुजारी सांगतात. येरमाळा हे सोलापूर औरंगाबाद रस्त्यावर आहे.





## हजरत शमशुद्दीन गाझी दर्गा

उस्मानाबाद येथे हजरत शमशुद्दीन गाझी यांचा दर्गा प्रसिद्ध आहे. उस्मानाबाद नगरीचे हे ग्रामदैवत आहे. या दर्ग्यात फारसी भाषेतील कोरलेले एक शिलालेख असून त्यात या पुरुषाचा निर्वाणकाळ ७२० हिजरी असा दिलेला आहे. हा दर्गा फारच भव्य, सुंदर, प्राचीन शिल्पकलेच्या दृष्टीने प्रेक्षणीय आहे. दरवर्षी येथे त्यांचा उरूस भरतो.

## सोनारीचा कालभैरव

परंडयाच्या उत्तरेस ७ कि.मी. अंतरावरील सोनारी या गावी श्री. कालभैरवनाथ मंदिर आहे. चंड नावाच्या दैत्याचा मुलगा प्रचंड हा गोदावरीच्या दक्षिण भागात दंडकारण्यात (हल्लीचे परंडा) राहत होता. त्याच्या त्रासाने सर्व पीडित शंकराला शरण गेले. शंकराने काशी क्षेत्राच्या रक्षणासाठी जे ८ भैरव आपल्या नेत्रातून निर्माण केले होते. त्यापैकी कालभैरव याने या प्रचंड दैत्याचा तसेच सुवर्णसूर, भैमकासुराचा वध केला. त्यानंतर शंकराने त्याचा सुवर्णपुरी उर्फ सोनारीत राहण्याची आज्ञा केली. त्यामुळे कालभैरव सोनारीत वास्तव्य करू लागले.

